हर्षवर्धन सपकाळ
अध्यक्ष

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

संपर्क ९६११९५ ३३०००
९६११९८ ३३०००

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email : office@mahacongress.com

जावक ०१/२०२५ दि. २ जानेवारी २०२६

प्रति,

**मा. श्री. दिनेश वाघमारे**

राज्य निवडणूक आयुक्त

मुंबई,

**विषय: विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्यावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करून त्यांचे नातेवाईक असलेल्या उमेदवारांच्या प्रचारात सक्रिय असलेल्या विधानसभा अध्यक्षांच्या कार्यालयातील अधिकारी कर्मचा-यांवर कारवाई करणेबाबत.**

महोदय,

राज्यात महानगरपालिकांच्या निवडणुका सुरु असून आदर्श आचारसंहिता लागू आहे. लोकशाहीमध्ये निवडणूका निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भिड वातावरणात पार पाडणे हे आपल्या आयोगाचे कर्तव्यच आहे परंतु या निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर हरप्रकारे दबाव आणून अर्ज मागे घेण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे विधानसभेचे विद्यमान अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करुन घेऊ नये यासाठी प्रशासनावर दबाव आणला, विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले हे अत्यंत गंभीर आहे. श्री. राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर आहेत, त्यांच्याकडून अशापद्धतीने कायदा धाब्यावर बसवून दडपशाहीचा मार्ग अवलंबणे लोकशाहीचा खून करण्यासारखे कृत्य आहे.

मुंबईतील कुलाबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्रमांक २२५, २२६ व २२७ मधून श्री. राहुल नार्वेकर यांचे भाऊ मकरंद नार्वेकर, बहिण गौरवी शिवलकर व वहिनी हर्षदा नार्वेकर या तिघांनी भाजपा कडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत, अर्ज दाखल करताना श्री. राहुल नार्वेकर हे स्वतः उपस्थित होते. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असताना श्री. राहुल नार्वेकर यांनी पोलिसांच्या माध्यमातून भाजपा उमेदवारांच्या विरोधात अर्ज दाखल करणा-या विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले तसेच अर्ज भरण्यापासून रोखण्यात आले, अशा

INDIAN NATIONAL CONGRESS

हर्षवर्धन सपकाळ
अध्यक्ष

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

संपर्क ९६१९५ ३३०००
९६१९६ ३३०००

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.

Email : office@mahacongress.com

प्रकारे एका महत्वाच्या व संवैधानिक पदावरील व्यक्तीने लोकशाहीचे धिंडवडे काढून निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणला आहे या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या कुटुंबातील तीन सदस्य निवडणुकीत उभे आहेत, त्यांच्या प्रचारासाठी मा. विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयातील तब्बल ७० अधिकारी व कर्मचारी काम करत आहेत, शासकीय पदावरील हे अधिकारी व कर्मचारी एका पक्षाच्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारात सक्रीय भाग घेत असतील तर ते कायद्यानुसार चुकीचे आहे. स्वतः श्री. राहुल नार्वेकर यांचे वर्तन आक्षेपार्ह व आदर्श आचारसंहितेचा भंग करणारे असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी तसेच त्यांच्या कार्यालयातील सर्व ७० अधिकारी व कर्मचारी यांना कार्यमुक्त करून त्यांच्यावरही आचार संहिता भंगाचे गुन्हे दाखल करावेत, अशी आमची मागणी आहे.

आमच्या मागणीचा गांभिर्याने विचार करून कारवाई करावी व महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे, आणि आ.निवडणूक आयोगाच्या पाठीचा कणा मजबूत आहे हे आपण दाखवून द्यावे.

धन्यवाद

आपला

**(हर्षवर्धन सपकाळ)**